शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर
विद्वत्प्रमाणित, यु.जी.सी. मान्यताप्राप्त त्रैमासिक
(Peer Reviewed Referred Research Journal )
ISSN No. 2319-6025

# शिविम संशोधन पत्रिका

वर्ष-नववे : अंक तेविसावा । जुलै ते सप्टेंबर २०२०



डॉ. पुष्पा भावे
विनम्र अभिवादन !

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे विद्वत्प्रमाणित त्रैमासिक

# शिविम संशोधन पत्रिका

(Peer Reviewed Referred Research Journal )

ISSN No. 2319-6025

(विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली, मान्यता अ. क्र. ६४१७५)

**वर्ष–नववे : अंक तेवीसावा**

जुलै – सप्टेंबर २०२०

संपादक

**डॉ. शिवकुमार सोनाळकर**

कार्यकारी संपादक

**डॉ. नीला जोशी**

संपादक मंडळ

**डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. गोमटेश्वर पाटील, डॉ. तातोबा बदामे, डॉ. दिनेश वाघुंबरे**

सल्लागार समिती

**डॉ. राजन गवस, डॉ. प्रकाश कुंभार, डॉ. डी. ए. देसाई, डॉ. अनिल गवळी**

**प्रकाशक**

अध्यक्ष, शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, कोल्हापूर

अनुराज, ७/ब, सूर्यवंशी कॉलनी, सानेगुरुजी वसाहत, कोल्हापूर ४१६ ०११

**मुद्रक**

भारती मुद्रणालय

८३२ ई वॉर्ड, शाहूपुरी ४ थी गल्ली, कोल्हापूर. फोन : (०२३१) २६५४३२९

मूल्य : रु. १००/-

Scanned with CamScanner

# अंतरंग


संपादकीय / डॉ. नीला जोशी ........................................ ३

सामाजिक चळवळी व लेखनाचा प्रागतिक वारसा / डॉ. रणधीर शिंदे ............ ५

'बोलावे ते आम्ही': व्यापक विश्वभानासाठीचा आग्रही संवाद / डॉ. रफिक सूरज १२

सातपाटील कुलवृत्तांत : कुतूहल वाढवणारी कादंबरी / डॉ. एकनाथ आळवेकर.. १८

माणदेश : दरसाल दुष्काळ - भूसांस्कृतिक दस्तऐवज / डॉ. मानसी जगदाळे ..... २३

परिघावरच्या वंचित नायकाचा शोकात्म स्वर : फेसाटी / डॉ. सागर लटके ...... ३१

दलित वैचारिक साहित्य / डॉ. अरुण शिंदे ........................................ ३८

वैचारिक वाङ्मय : विचार व विचारवंत / डॉ. महेश गायकवाड ................ ४९

यशवंतराव चव्हाण यांचा साहित्यिक पत्रव्यवहार / डॉ. धनंजय होनमाने ......... ५८

मराठी लोककला आणि लोकनाट्य / डॉ. संग्राम थोरात ........................ ६५

फार्स : प्रहसन की हास्यात्मिका ? / डॉ. आनंद बल्लाळ ........................ ७६

बारी : रुप आणि अविष्कार / प्रा. डॉ. आबासाहेब शिंदे ........................ ८४

प्रवासवर्णनांचे स्त्रीवादी आकलन / प्रा. वैशाली गुंजेकर ........................ ९३

प्रवासवर्णन या साहित्यप्रकाराचे स्वरूप / डॉ. प्राजक्ता निकम ..................... ९८


2022.03.24 1


Scanned with CamScanner

# मराठी लोककला आणि लोकनाट्य

डॉ. संग्राम गोपीनाथ थोरात

## प्रस्तावना

मराठी लोकनाट्य या लोककलेने समाजाचे मनोरंजन केले व समाजाने या लोककलेचे संरक्षण व संवर्धन केले. ही कला सादर करताना कलावंतांनी कसल्याही मोबदल्याची अपेक्षा बाळगली नाही. त्यांच्या पिढ्यान्‌पिढ्या त्यासाठी खपत असतात. आपले संपूर्ण जीवन कलेसाठी वाहिलेले हे कलावंत म्हणजे भारतीय संस्कृतीतील त्यागाचे एक आदर्श आहेत. त्यांच्या संस्कारावरच पुढची पिढी पोसली जात आहे. हे पूर्वजांचे ज्ञानभांडार लोकांपर्यंत पोहोचविणे व त्याला नव्या पद्धतीने पेश करण्याची आज गरज आहे. शाहीर, गोंधळी, भराडी, वाघ्या, मुरळी, बहुरूपी यांनी विकसित केलेले कलाप्रकार इतिहास काळात जनसंपर्काची साधने ठरली होती. छ. शिवरायांच्या स्वराज्याच्या उभारणीत गुप्तहेर बहिर्जी नाईक यांनी अशा अनेक कलाप्रकारांचा आश्रय घेतल्याचे इतिहास सांगतो. आजच्या जागतिकीकरणाच्या काळातही या कलांचा संपर्कमाध्यम म्हणून वापर करता येईल. त्यांचे योग्य जतन व संवर्धन होणे ही काळाची गरज आहे. या माध्यमातून समाजाच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, सामाजिक मूल्ये, इतिहास सांस्कृतिक विकासाचा आलेख मांडण्यासाठी लोककलांचा चांगला उपयोग होऊ शकतो. लोकनाट्य या लोककलेतूनही या सर्व गोष्टी साध्य झालेल्या आहेत. आजचे लोकनाट्य बदलत्या स्वरूपात समोर येताना सामाजिक परंपरेचे दर्शन घडविण्याचे काम समर्थपणे करीत आहे.

## मराठी लोकनाट्य आणि लोककला

आज मराठी भाषेत 'लोकसाहित्य' ही संकल्पना चांगलीच रूढ झाली आहे. ''इंग्रजीतील Flok- Lore साठी श्रीमती दुर्गा भागवत यांनी हा पर्याय प्रथम सुचविला.''[१] तर याच शब्दांसाठी '' 'लोकविद्या' असा एक मराठी पर्याय म.म.द.वा. पोतदारांनी सुचविला आहे.''[२] या लोकविद्यांमध्ये प्रायोगिकतेवर भर असणाऱ्या लोककलांना महत्त्वाचे स्थान आहे. ''या कलेतील कथा, गीते मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीला देण्याची पद्धती रूढ होती. प्रारंभी दैवत कथा, दंतकथा आणि गीतांच्या माध्यमातून हे ज्ञान भांडार प्रवाहित होत असावे असे अलीकडील 'लोकसाहित्याच्या' अभ्यासावरून स्पष्ट झालेले आहे.''[३] सामान्य जनांपर्यंत हे ज्ञान सहजपणे नेण्यासाठी त्या कथा साभिनय व गायनासह सादर होत असत. या सादरीकरणामध्ये सातत्याने नवनवी भर पडत राहिली व त्यांचा विकास झाला. पुढे रंजनासाठी नृत्य, नाट्य स्वरूपातही सादरीकरणाची कल्पना पुढे आली. यामधूनच पुढे लोकनाट्य, लोकसंगीताचे



ISSN No. 2319-6025

Scanned with CamScanner

प्रकार व लोकनृत्य यांचा विकास झाला. यांतील दैवतकथांना विधिनाट्याची जोड मिळाली व लोककलांचा प्रवास मार्गस्थ झाला. या लोककलांमधून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे व लोकजीवनाचे दर्शन घडते. ह्या लोककला सादर करणारे कलावंत समाजाचे रंजन करता करता त्यांना शिक्षणही देऊ लागले व तेच त्यांचे चरितार्थाचे साधनही बनले. देवीचा गोंधळ घालणारे गोंधळी, खंडोबाचे विधिनाट्य सादर करणारे वाघ्या, मुरळी, नाचगाणी ऐकवून पोट भरणारे कोल्हाटी, पोतराज, बहुरूपी अशा अनेक कलावंतांचे हे चरितार्थाचे साधन बनले होते. या सर्व विधिनाट्यांमध्ये नृत्य, नाट्य व संगीताला महत्त्वाचे स्थान होते. ''यादव राजवटीत यातील 'कोल्हाटिका'च्या नृत्य - नाट्य - संगीतमय जलस्यांचा उदय झालेला आढळतो. तर देवी भवानीच्या गोंधळातून आणि ललितातून देव-देवतांच्या कथांची निरूपणे चालत. या सर्व लोककलांच्या एकत्रिकरणातूनच मराठीतील तमाशाचा जन्म झाला. तेच 'लोकनाट्य' होय.''[४] प्राचीन काळापासून महाराष्ट्रात चालत आलेल्या अनेक लोककलाप्रकारांमध्ये तमाशाही महत्त्वाची रंजनप्रधान लोककला आहे. ''ती मूलतः प्राकृत जनांची, ग्रामीणांची कला आहे. वस्तुतः ती भजन, कीर्तन, ललीत, विधिनाट्य या सारखी ग्रामीण संस्कृतीतील एक लोकप्रकटन संस्थाच आहे.''[५] कारण तमाशातून, लोकनाट्यातून प्राधान्याने व्यक्त होते ते ग्रामीण लोकमानस व हे सर्व प्रकट होते ग्रामीण भाषेतून ह्या लोककलावंतांची अभिव्यक्तीही त्या ग्रामीण जनसमूहाच्या लोकभाषेतूनच होत असते. ''सातव्या शतकात शिलालेखातून दिसणारी शब्दरूप मराठी भाषा लोकसमूहाचीच भाषा होती म्हणून या भाषेला 'लोकभाषा' व तिच्यातून निर्माण झालेल्या कलांना 'लोककला' म्हणण्याचा अभ्यासकांना मोह होतो.''[६] ह्या जनसामान्यांच्या भाषेतूनच पुढे तमाशातील वगनाट्याचाही विकास झाला. तमाशा/लोकनाट्य, मुक्तनाट्य असा विकास साधताना त्याने ग्रामीण भाषेची साथ सोडली नाही. आजही जत्रांतून सादर होणाऱ्या तमाशातून अस्सल ग्रामीण भाषेचाच वापर केला जातो आणि त्यामुळेच लोकनाट्य हे माध्यम शहरी लोकांपेक्षा खेड्यातील लोकांना जवळचे वाटते. सामान्यांच्या वेदना, श्रम हलके करण्याचे काम लोकनाट्यासारख्या लोककला करतात. ''अशा लोककला सर्वांना श्रोते म्हणून एकाच बैठकीवर एकत्र आणतात. त्यामुळे अशा लोककला माणसाला माणसानेच निर्माण केलेल्या भेदाभेदांच्या पलीकडे नेतात. सहजीवन व सहिष्णुता वाढीला लावण्याचे महान कार्य लोककला साधत असतात. प्रांत, भाषा, धर्म, वंश ह्यापैकी कोणताही अडथळा लोककलांच्या आस्वाद प्रक्रियेच्याही आड येत नाही. म्हणून लोककलांचा राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावण्यास उपयोग होत असतो. याचसाठी लोककलांना राष्ट्रीय ऐक्याची प्रयोगशाळा म्हणणेच योग्य ठरते.''[७]

Scanned with CamScanner

## लोकनाट्याचे घटक

तमाशा हा लोककलाप्रकार जनसामान्यांच्या मनबुद्धीला रिझविणारा प्रकार आहे. सामान्यांना आवडणारा व त्यांच्या पसंतीस उतरलेला हा प्रकार, पुढे लोकप्रियतेच्या प्रचारासाठी त्याचा उपयोग केला गेला. पारंपरिक तमाशातील वगनाट्य म्हणजेच हे लोकनाट्य फक्त त्या नाट्यरूप वगाचा आधुनिक स्वरूपात प्रचाराच्या हेतूने उपयोग केला गेला. आधुनिक काळातील लोकनाट्यांमध्ये सत्यशोधकी जलस्यांच्या माध्यमातून सत्यशोधक समाजाचे विचार, आंबेडकरी जलस्यांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार व त्यांचा प्रसार केला जाऊ लागला. तसेच राष्ट्रसेवा दल, काँग्रेस पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, कम्युनिष्ट पक्ष अशा राजकीय संघटनांनीही लोकनाट्य हे माध्यम प्रचारासाठी स्वीकारले. विविध शाहिरांनीही या माध्यमातून सामान्यांचे प्रबोधन करण्याचे काम केले.

पारंपरिक तमाशा गणेशाच्या स्तवनाने म्हणजेच गणाची लावणी म्हणून केला जातो. आधुनिक लोकनाट्यातही 'गणाची लावणी' असतेच; पण ही लावणी पारंपरिक तमाशातील गणपतीच्या स्तुतिगीतापेक्षा वेगळी असते. म्हणजेच लोकनाट्याने पारंपरिक तमाशातून गणाची लावणी स्वीकारली पण आधुनिक काळाशी अनुरूप अशी ठरेल अशा स्वरूपात ती सादर होऊ लागली. म्हणजेच हा मराठी तमाशाचा विकासच आहे. या लोकनाट्याचा अनेक अभ्यासकांनी अभ्यास केला व त्याच्या गुणवैशिष्ट्यांची ओळख करून दिली. एक वाङ्मयप्रकार म्हणूनही लोकनाट्यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी आपल्या पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य या पुस्तकातून केला आहे. त्यामुळे लोकनाट्याच्या वैशिष्ट्यांचा मागोवा घेण्याअगोदर लोकनाट्याच्या अभ्यासकांच्या मतांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

मराठी लोकनाट्याच्या अभ्यासकांमध्ये वि.कृ.जोशी, नामदेव व्हटकर, डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी संशोधन केले आहे. पारंपरिक तमाशाच वेगळेपणाने लोकनाट्यातून सादर होताना दिसतो. त्याच्या घटकांविषयी वि.कृ.जोशी यांनी ''गण, गवळण, संगीत लावणी, दौलत जादा, रंगबाजी, छक्कड, फार्स, वग असे आठ घटक असल्याचे दाखवून दिले आहेत.''[८] परंतु आपण आजच्या आधुनिक लोकनाट्यांचा विचार केल्यास वरील काही वैशिष्ट्ये आज दिसत नाहीत बहुदा ही वैशिष्ट्ये सांगताना वि.कृ.जोशींच्या डोळ्यांसमोर स्वातंत्र्यपूर्व काळातील तमाशा असावा. कारण आजच्या लोकनाट्याच्या प्रेरणा आधुनिक सुधारणावादाची आहे. त्यामुळेच या पारंपरिक तमाशातून जलशांची निर्मिती झाल्याचे दिसते. या जलस्यांतून लोकांना विचार देण्याचे काम केले आहे. अशा जलस्यांमध्ये


ISSN No. 2319-6025

१. आंबेडकरी जलसे
२. सत्यशोधकी जलसे
३. रसात्मक किंवा नर्तकीचे जलसे
४. राष्ट्रसेवा दलाची शाहिरी पथके
५. लोककला माध्यमातील शाहिरी पथके
६. राष्ट्रीय शाहिरी पथके
७. दांगट शाहिरी

यांचा समोश होतो. कलापथकाचे किंवा जलस्यांचे उद्देश वेगळे असल्याचे प्रत्येकाच्या सादरीकरणात वेगळेपणा दिसतो.

लोकनाट्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणारे नामदेव व्हटकर व डॉ. विश्वनाथ शिंदे यांनीही लोकनाट्याची वैशिष्ट्ये/घटक सांगितले आहेत. नामदेव व्हटकरांनी स्वातंत्र्योत्तर लोकनाट्याचे घटक सांगितले आहेत.

१) लोकनाट्याची विशिष्ट वाद्ये
२) तमाशा पद्धतीची लावणी
३) नाची अथवा नाच्याचा वैशिष्ट्यपूर्ण नाच
४) लोकनाट्याचा एक वेगळाच असलेला थाट, ढब किंवा धाटणी
५) वग[९]

असे पाच घटक सांगितले आहेत. तर डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी खालील घटक सांगितले आहेत. "१) गण २) गौळण ३) लावणी ४) भेदिक ५) बतावणी ६) वग[१०] यातही पूर्वार्धात गण, गौळण, लावणी व बतावणी व उत्तरार्धात भेदिक व वग असे दोन भाग त्यांनी केले आहेत. वरील सर्व अभ्यासकांची मते पाहिल्यास गण व गौळणीला तसेच लावणीला सर्वांनीच स्थान दिले आहे. नामदेव व्हटकर यांनी वाद्यांना या घटकांत स्थान देऊन शाहिरीतील वाद्यांचे महत्त्व अधोरेखित केल्याचे दिसते. परंतु वरील सर्व घटकांमधील आजच्या आधुनिक वगनाट्यात फक्त गण, गौळण, बतावणी व वग यांचेच दर्शन घडते. म्हणजेच आजच्या श्रोत्यांच्या मागणीनुसार लोकनाट्याचेही स्वरूप संक्षिप्त झाल्याचे दिसते.

## मराठी लोकनाट्याचा विकास

ज्याला अलीकडे लोकनाट्य म्हटले जाते. त्या कला प्रकाराला तमाशा हे नाव रूढ झाले होते. आजही खेड्यापाड्यातून लोकनाट्याला तमाशाच म्हणतात. तमाशा या खेळाविषयी व त्याच्या विकासातील टप्प्यांविषयी विचार येथे करावयाचा आहे. त्यासाठी मराठी भाषेच्या उगमापर्यंत जावे लागते. मराठी भाषेने ग्रंथरूपात प्रवेश



Scanned with CamScanner

केल्यानंतर सुरुवातीच्याच 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथात 'पवाडा' हा शब्द आढळतो. तो कीर्ती या अर्थाने तेथे अवतरतो. यानंतर सारा महाराष्ट्र इस्लामी राजसत्तेच्या अंमलाखाली गेला. या काळातील तमाशाचे स्वरूप शोधणे आवश्यक वाटते.

महाराष्ट्राची संस्कृती, मराठी माती व मराठी लोकांचे लोकमानस यांचे प्रकटीकरण म्हणजे महाराष्ट्री अपभ्रंशापासून पुढे विकसित झालेली देशी भाषा होय. ती भाषा मराठी प्राकृत होय. ''या भाषेच्या जन्मकाळी महाराष्ट्रात रूढ असलेले नृत्य, नाट्य, संगीतप्रधान लोककला प्रकार तेथील 'गीत शाळेत' व 'आखाड्यातून शिकविले जात असत.''[११] तसेच ओवी अभंगासारखे छेदही प्रथम अपभ्रंश भाषेतील तत्कालीन लोकगीतांत आले तर मराठी शाहिरीतील लावणी छंदही याच क्रमाने अवतरताना दिसते. यादवकाळात नृत्य, नाट्य व संगीताच्या माध्यमातून अनेक जलसे चालत असत. परंतु याचे मूळही आपणाला महाराष्ट्री अपभ्रंश भाषेतील 'सट्टक' या तमाशाशी साम्य असणाऱ्या नाट्यप्रकारात शोधावे लागते. म्हणजेच या भाषेतील तमाशासदृश 'सट्टक' या नाट्यप्रकारालाच की ज्यातून रंजन होत होते. पुढे 'तमाशा' हे नाव वापरलेले असावे. कारण ज्ञानेश्वरीत 'पवाडा शब्द सापडतो; परंतु त्यांचेच अनुयायी संत एकनाथ यांनी वैविध्यपूर्ण भारूडे लिहिली. रूपकात्मक रचनांच्या माध्यमातून बहुजनांना आध्यात्मिक मार्ग दाखविला. त्यांनी जोहार, गोंधळी, जागरण, जोगवा अशा अनेक प्रकारांवर भारूडे लिहिली. परंतु तमाशावर त्यांचे एकही भारूड नाही. याचाच अर्थ या काळातील संगीतप्रधान प्रकारालाच पुढे 'तमाशा' हा शब्द वापरल्याचे दिसते. अशा रीतीने लावण्या तमाशे हे सतराव्या शतकाचा शेवट आणि अठराव्या शतकाची सुरुवात या वेळी जन्माला आले. ज्या अर्थी या कलाप्रकाराचे 'तमाशा' हे नावच उर्दू भाषेतील आहे, त्या अर्थी ती भाषा बोलणाऱ्या लोकांच्या महाराष्ट्रातील प्रवेशानंतर तो जन्माला आला असावा हे निर्विवाद आहे. ''तमाशात नाची नाचवून शृंगाराचा प्रकार करून दाखवण्याची पद्धत उत्तर हिंदुस्थानातली आहे.''[१२] पुढे या संगीतप्रधान कलाप्रकाराचे नाटकात रूपांतर झाले. तेच मराठी भाषेतील लोकनाट्य आजकाल त्यालाच आपण तमाशा (लोकनाट्य तमाशा मंडळ) असे म्हणतो. ''या कलाप्रकारात दिवसेंदिवस बदल होत राहिला व पुढे सलग कथानक असलेली आणि जिच्यावर रात्रभर चालणारा नाट्यमय खेळ प्रत्यक्ष करून दाखवता येईल. अशा स्वरूपाची आख्यानक लावणी १८५० नंतर रचली जाऊ लागली अशा आख्यानक लावणीवर केलेल्या तमाशा खेळाला वग असे नाव पडले. वग हेच लोकनाट्य. हे वगाचे खेळ १८६० नंतर सुरू झाल्याचे दिसून येत.[१३] शाहिरीचे अभ्यासक नामदेव व्हटकर यांचे वरील मत पाहिल्यास लोकनाट्याचा म्हणजेच वगाचा विकास पाहणे येथे क्रमप्राप्त ठरते. हा तमाशा सुरुवातीच्या काळी मांग, महार, गोंधळी, डोंबारी



ISSN No. 2319-6025

Scanned with CamScanner

यांच्याच हाती असल्याचे दिसून येतो व पुढे त्याचा विकास होत राहिला. या तमाशाच्या परंपरेत पश्चिम महाराष्ट्र अग्रेसर होता. याच भागातील सांगली जिल्ह्यातील पेड आणि सावळज या गावाची उमा-बाबूची जोडी आद्य लोककलाकारांपैकी आहे. या दोघांनी पहिला तमाशा वग रचला. ''म्हणजेच सर्वसाधारणपणे मराठीशाहीच्या अखेरीस आणि इंग्रजी राजवटीच्या उदयाला आलेल्या तमासगिरांच्या लोकनाट्याचा प्रारंभ उमाजी मांग यांच्यापासून झाल्याचे सांगितले जाते.[१४] 'मोहना बटाव' या त्यांच्या लोकनाट्याने आधुनिक मराठीतील लोकनाट्यांचा म्हणजे 'तमाशा'चा प्रारंभ झाला. हा उमाजी शाहिरी वातावरणात वाढलेला होता. बालपणी त्याने शाहीर संभू-राजू यांच्या घरी घरगडी म्हणून त्यांची गुरे राखण्याचे काम केले होते. त्यावेळी शाहीर हैबती व संभू-राजू यांच्यात रंगलेल्या सवाल-जबाबांचे फड त्याने प्रत्यक्ष पाहिलेले होते. त्यामुळे त्याच्यावर शाहिरीचे संस्कार झाले होते. यातूनच पुढे त्याने तमाशाचा फड सुरू केला. उमाजीच्या जोडीला पेडचा बाबाजी मांग हा साथीदार होता. ही जोडी पुढे उमा-बाबू या नावाने पश्चिम महाराष्ट्रात गाजू लागली. उमाजीला शाहिरीच्या या प्रवाहात पुढे त्याचा मुलगा तात्या सावळजकर याने तमाशा चालवून साथ दिली.

उमा-बाबूने मराठी लोकनाट्याचा पाया रचला व त्याचा पुढे विस्तार होत गेला. या लोकनाट्याच्या प्रवासात शाहीर पठ्ठे बापूराव यांचे स्थान अढळ आहे. ''पठ्ठे बापंच्या उत्कर्षाचा काळ इ.स. १९०० ते १९१० च्या सुमाराचा आहे. उमाजी आणि बाबाजी यांनी पहिला मोहना बटावाचा वग १८६०-७० या दशकात रचला. त्याच दशकात श्रीधर कृष्ण कुलकर्णी म्हणजेच पुढे गाजलेला पठ्ठे बापूराव याचा जन्म ११ नोव्हेंबर, १८६६ रोजी झाला.''[१५] तत्कालीन सातारा जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील रेठरे हरणाक्ष या गावी जन्मलेल्या या बालकाचा गळा गोड असल्याने कविता म्हणण्यात तो पटाईत होता. चौथीपर्यंतच्या शिक्षणानंतर बापूराव औंधच्या श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी यांच्या आश्रयाला गेला. पुढे तो औंधच्या राणीसाहेबांबरोबर त्यांच्या माहेरी बडोद्यास गेला. तिथे दरवर्षी शिमग्याच्या सणात तमासगीरांचे फड भरत त्या फडातील कवने दुरुस्त करून देण्याचे काम तो करू लागला. पुढे रेठऱ्यास माघारी आल्यावर रिकाम्या वेळेत तो गावातील महारवाड्यातील तमाशा फडात जाऊ लागला व त्यांना भेदिक लावण्या रचून देऊ लागला. या लावणीच्या व शाहिरीच्या नादाने तो मुंबईत आला. मुंबईत त्यावेळी भेदिक लावणी फडाच्या जंगी लढती तिकीट लावून चालत असत. त्याला तमाशातील विशेषतः शाहीर हैबतीच्या आध्यात्मिक तमाशातील गायकीने प्रभावित केले. त्यावेळच्या महार-मांग जातीतील अशिक्षित कवींच्यात हा थोडा शिकलेला व बालपणापासून काव्याचे अंग असणारा बापूराव स्वतःच्या काव्याने सर्वांना प्रभावित करू लागला. त्यांच्या या शाहिरी प्रेमामुळेच तो तमाशाकडे वळला.

त्याच्या शीघ्र कवित्वामुळे तो तमाशा क्षेत्रात प्रसिद्ध झाला. याच काळात त्याने आपला 'मिठाराणी' हा वग तयार केला. इ. स. १९०८-०९ च्या सुमाराला बापूराव-पवळा कोल्हापुरास गेले व छ. शाहू महाराजांच्या राजवाड्यात हा वग त्यांनी सादर केला. हा वग महाराजांना आवडला. अशा प्रकारे लोकनाट्य क्षेत्रात एका नव्या शाहिराने जन्म घेतला. त्याच्या लावणीसाहित्याचे वर्गीकरण करायचे झाल्यास खालीलप्रमाणे प्रकार पडल्याचे सांगितले जाते. ''१) गण आणि गौळण २) फार्स, फार्सा किंवा रंगबाजी ३)वग ४) झगडा ५) सवाल जबाब ६) भेदीक लावण्या ७) फुटकळ लावण्या''[१६] वरील वर्गीकरणाला पठ्ठे बापूरावचे लावणीसाहित्य म्हटले असले तरी लोकनाट्यात जे जे प्रकार रंगभूमीवर लावून दाखविले जातात तेच असल्याने हेच त्यांच्या लोकनाट्याचे विशेष आहेत. या सर्व विशेषांमध्ये त्यांचे वग हे त्याचे बलस्थान होते. वगातील कथानक, विनोद प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करीत असत. साक्षर-निरक्षर, खेड्यातील प्रेक्षकांपासून थेट मुंबईतील रसिकांपर्यंत त्यांच्या 'मिठाराणी' या वगाने प्रभाव टाकला होता. ''म्हणून त्याला 'लोकनाट्यातील' राम गणेश गडकरी' म्हणण्याचा मोह अभ्यासकांनाही आवरता येत नाही.''[१७] शाहीर पठ्ठे बापूराव यांनी रूढ लोककथेच्या आधारे लिहिलेला 'चंद्रभानू राजाचा वग' ही काल्पनिक लोककथा लोकनाट्यासाठी वापरली आहे. त्यामुळेच इ. स. १८९५ ते १९२० या पंचवीस वर्षात मराठी खेडूत पठ्ठे बापूरावाच्या लावणीवर आणि त्यांनी खेळून दाखवलेल्या तमाशावर वेड्यासारखा तुटून पडत होता. अशा या हरहुन्नरी शाहिराने वगाबरोबरच संगीत पदे, छकडी, भजनी पदे अशा अनेक रचना केल्या. परंतु पठ्ठे बापूरावाचे वेगळेपण त्याच्या फार्सात दिसून येते. ''म्हणूनच मराठी लोकनाट्याच्या इतिहासात पेड सावळजच्या उमा बाबूला पहिले वगकर्ते म्हणावे लागते तर दुसऱ्या पिढीतील पठ्ठे बापूरावाला पहिला फार्सरचयिता म्हणावे लागेल''[१८], असे अभ्यासकांचे मत आहे. असे असले तरी त्यांचे वग हे त्यांचे सामर्थ्य आहे. या वगांच्या साहाय्यानेच त्यांच्याकडून लोकनाट्याच्या विकासास हातभार लागला आहे.

पठ्ठे बापूरावाच्या शाहिरी क्षेत्रातील अलौकिक कालखंडानंतर शाहिरीच्या पुढच्या पिढीत अर्जुन वाघोलीकर, दगडू साळी तांबे (शिरोलीकर) आणि भाऊ फक्कड यांची लेखनी शाहिरीसाठी झिजली. त्यातील अर्जुन वाघोलीकर या पुण्याजवळील वाघुली या गावच्या शाहिरांनी आपल्या साऱ्या तमाशा फडाचे व सहकाऱ्याचे वर्णन असे केले आहे.

''पुणे देशात गाव वाघुली। जडण करतो अर्जुना ख्याली
बलिस्टरांची लावणी केली। नाना गुलाबाची गट्टी जमली
कोंडू नाच्या चंद्रज्योत लावली। विष्णू हणमंता लावी नेऱ्या चाली

दादोबाला पाहून वैरी भ्याली। सोनू मारूतीने आरोळी दिली.
ताल सुराला.
अक्कलनाथानी दया करून। मरी आई लक्ष्मी प्रसन्न
नित नवी तोड आहे वैऱ्याला''-१९

या शाहिराने स्वतःची नवनिर्मिती करून मराठी शाहिरीला एक नवे परिणाम प्राप्त करून दिले. ''त्याने पुण्याची लावणी, मुंबईची लावणी अशा ढंगदार लावण्यांबरोबरच हुजऱ्याचा वग, पैलवानाचा वग, सावकाराचा वग''२० असे वग लिहिले व मराठी लोकनाट्याच्या विकासास हातभार लावला. त्याचाच समकालीन दगडू साळी तांबे (शिरोलीकर) याने ''वग पतिव्रतेचा, वग सहा गोसाव्यांचा, स्त्री-पुरुषाचा विनोद, वग मनोहर गिरीधरचा, वग मित्राचा, वग आकलीचा''२१ अशी सामाजिक स्वरूपाची लोकनाट्ये लिहून लोकनाट्याचा प्रवाह अखंड चालू ठेवण्याचे काम केले. हा दगडोबा साळी सोंगाड्या कलाकार म्हणून नावारूपास आला. त्यामुळेच त्याला 'सोंगाड्यांचा सम्राट' म्हणून संबोधले जाते. याच यादीतील तिसरा प्रतिभावंत शाहीर म्हणजे भाऊ फक्कड सातारा जिल्ह्यातील पाटण तालुक्यातील मुद्राळे या गावचा हा शाहीर तरुणपणात शिवासंभाच्या फडात नाच्या होता. याच फडाचा तो पुढे कवी झाला. त्याने रचलेली पाच भाषेतील एक गौळण आजही प्रसिद्ध आहे. ''केवळ हे तीनच नव्हे, असे अनेक कवी या खऱ्याखुऱ्या लोकांच्या लोकनाट्यात अंधारातच जन्मले. लोकांची मने त्यांनी रंजविली आणि अनुल्लेखाच्या अंधारातच त्यांचा अंत झाला.''२२ अशा प्रकारे या कालखंडात झालेले विपुल शाहिरी लेखन व लोकनाट्ये कल्पनाप्रधान, कथानकांवर आधारित असल्याचे दिसते.

उमा-बाबापासून ते भाऊ फक्कड यांच्यापर्यंतचा लोकनाट्याचा इतिहास अभ्यासल्यास एक गोष्ट लक्षात येते ती म्हणजे, यांच्या तमाशातून जी लोकनाट्ये सादर केली जात ती प्रामुख्याने पौराणिक व ऐतिहासिक कथांवर आधारलेली होती. पुराणातील कथा रंजनात्मक पद्धतीने सांगून लोकांचे मनोरंजन केले जात असे. तसेच राजा, राणी व प्रधान यांच्या साहाय्याने एका काल्पनिक कथेच्या आधारे श्रोत्यांना खिळवून ठेवण्याचे काम शाहीर करीत असत. त्यातही ही वगाची संहिता लिखित स्वरूपात नसे तर पात्रांच्या मुखातून पाठांतराच्या माध्यमातून हे संवाद ओघाने येत असत. म्हणून त्यांना ओघाओघाने आलेला तो 'वग' असे संबोधले गेले. या वगातून म्हणजेच लोकनाट्यातून वेगवेगळे विषय हाताळले गेले. त्यांचे विषयानुसार वर्गीकरण करताना डॉ. विश्वनाथ शिंदे यांनी १) पौराणिक लोकनाट्ये (वग) २) ऐतिहासिक लोकनाट्ये ३) लोककथात्मक ... प्रकार पाडले आहेत. आजच्या लोकनाट्याचेही

आपणास याच्यापेक्षा वेगळे वर्गीकरण करता येणार नाही. यातील सामाजिक लोकनाट्याचा उपयोग सामाजिक विचाराच्या प्रसारासाठी समाजसुधारकांनी वापर केला. 'आंबेडकरी जलसे', 'सत्यशोधकी जलसे', 'राष्ट्रसेवा दलाचे जलसे' यांचा जन्म सामाजिक विचारांच्या प्रसाराच्या उपयुक्ततेतून झाल्याचे दिसते. ''पौराणिक वगामध्ये असणारे नाट्य घेऊन या जलशांनी आधुनिक मराठी लोकनाट्यांची मुहूर्तमेढ रोवली. पारंपरिक तमाशातील 'वग' हा नाट्यपूर्ण असायचा. त्याचे कथानक लोकांना रिझवित असत त्यामुळे लोकसमूहाशी त्याचे नाते होते. लोकमानस हा त्याचा केंद्रबिंदू होता म्हणून परंपरेने चालत आलेल्या लोकसाहित्याच्या काही गुणविशेषांचा स्वीकार करणारा हा कलाप्रकार होता. त्यातल्या नाट्यानुकुलतेमुळे त्याला 'लोकनाट्य' असे म्हटले जाऊ लागले.''[२३] आधुनिक लोकनाट्याच्या जडणघडणीत जलश्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.

सत्यशोधकी जलसे, आंबेडकरी जलसे यांनी आपल्या विचार, प्रसारासाठी लोकनाट्य या कलाप्रकाराचा वापर केला. त्याचप्रमाणे राष्ट्रसेवा दलानेही समाजवादी पक्षाच्या प्रचारासाठी समाजातील बेकारी, अस्पृश्यता, दारिद्र्य यांचा नायनाट व्हावा व राष्ट्रप्रेम वाढावे असा विचार दिला जात असे. अशा कलापथकांतूनच मराठी व हिंदी चित्रपट सृष्टीला पुढे कलावंत मिळाले. राम नगरकर, स्मिता पाटील, निळू फुले, दादा कोंडके ही मोजकी नावे जरी घेतली तरी या कलापथकांचे यश दिसून येते. या कलापथकांना लागणारी लोकनाट्ये व्यंकटेश माडगूळकर, वसंत बापट, निळू फुले, पु. ल. देशपांडे यांनी लिहिली. ''या लोकनाट्यांतून लोकांच्या मनावर संस्कार करावयाचा असल्याने एखादे तत्त्व लोकनाट्याद्वारा सांगायचे व लोकमनावर नैतिक बोध करायचा असा उद्देश या लोकनाट्यांचा असलेला दिसतो.''[२४] पुढे हाच वैचारिक धागा पकडून अनेक शाहिरांनी लोकनाट्ये लिहिली त्यात शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे, नानिवडेकर, कृष्णराव साबळे, आत्माराम पाटील, विश्वासराव फाटे, खाडिलकर, मुचाटे यांचा नामोल्लेख करता येईल. या सेवादलाच्या कलापथकांतून सामाजिक प्रबोधन करण्यावर अधिक भर होता. 'यातूनच भारतीय दलित रंगभूमीच्या उदयाची प्रातःकाल झालेली आहे', असे दत्ता भगत यांनी तिसऱ्या अखिल भारतीय दलित नाट्य संमेलनाच्या 'अंबाजोगाई' येथील संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना सांगितले. वरील सर्व शाहिरांनी 'तमाशा' या लोकनाट्य प्रकाराचा कौशल्याने वापर करून सामाजिक प्रबोधन साधण्याचा प्रयत्न केला आहे. पारंपरिक तमाशातील नाट्याला नवी झळाळी देण्याचे काम या शाहिरांनी केले. त्यातही या नाट्याला नाटकाच्या अगदी जवळ नेण्याचे काम शाहीर कृष्णराव साबळे यांनी केले. ''त्यांनी या लोकनाट्याला 'मुक्तनाट्य' असे नाव दिले. त्यांनी लोकनाट्यातील गण - गवळणीला फाटा देऊन केवळ काल्पनिक आणि सुखात्मक नाट्यकथा आपल्या लोकनाट्यातून सांगितलेली आहे. पारंपरिक नाटक



Scanned with CamScanner

आणि नवनाट्य यांच्यापेक्षा वेगळे असलेले व बंदिस्त रंगभूमीवर सादर करता येऊ शकणारे लोककलेचा बाज घेऊन अवतरलेले असे हे मुक्तनाट्य आहे.''[२५]

## समारोप

असा हा लोकनाट्याचा विकास तमाशा, वगनाट्य, लोकनाट्य व शेवटी मुक्तनाट्य असा झालेला दिसतो. या लोकनाट्यांतून विचार व ज्ञान देण्याचे काम लेखकांनी केले. या लोकनाट्याच्या लेखनाबद्दल पु. ल. देशपांडे म्हणतात, ''नवी लोकनाट्यं लिहिणं हे आपलं पहिलं काम आहे आणि आज आपल्याला मुख्य विचार करायचा आहे. तो त्यासंबंधी काही एखादा विशिष्ट प्रचार करण्यासाठी आपण लोकनाट्याच्या एखाद्या प्रकाराचा आश्रय घेऊन जनतेला ज्ञान देण्यासाठी काही लिहिण्याचा प्रयत्न करतो. परंतु आजवर चालत आलेल्या परंपरेत रात्रभर जागत ठेवण्याची ताकद असलेली, मनोरंजनात्मक, अगदी थोड्या वेळात त्याच्या मनाची पकड घेणारी नाटकं रेडिओसाठी लिहिणाऱ्यांची आज प्रचंड वाण आहे. त्याच्या अभावी आज आम्ही अर्धवट, मोडतोड केलेली जुनी लोकनाट्यं सादर करून समाधान मानतो. मात्र त्यामुळं आकाशवाणीचंही समाधान होत नाही आणि लोकांचही....''[२६] या पुलंच्या मताचा विचार लेखकांस चिंतनास प्रवृत्त करतो.

## संदर्भ टीपा


१) भागवत दुर्गा, 'लोकसाहित्याची रूपरेखा', मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, मुंबई, १९.

२) डॉ. मांडे प्रभाकर, 'लोकसाहित्याचे स्वरूप', परिमल प्रकाशन, औरंगाबाद.

३) 'मराठी लोकसाहित्य समिती' आणि श्रीमती दुर्गा भागवत, डॉ. प्रभाकर मांडे, गंगाधर मोरजे आदि अभ्यासकांच्या अभ्यासाचे निष्कर्ष.

४) डॉ. उत्तेकर सुनिता, 'शाहीर साबळेः व्यक्ती आणि वाङ्मय', पीएच.डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, १९९२, प्रकरण ३ रे, पृ. २०५.

५) मांडे प्रभाकर, उनि. पृ. २४७ - २४८.

६) व्हटकर नामदेव, 'मराठीचे लोकनाट्य तमाशाः कला आणि साहित्य', जयश्री प्रकाशन कोल्हापूर, पृ. १०.

७) डॉ. चव्हाण शि. रा., 'मराठी लोकनाट्य उदय आणि विकास', सुशिपाज प्रकाशन, प्रथम आवृत्ती, ऑक्टो. १९९५, पृ. १२.

८) वि. कृ. जोशी, 'लोकनाट्याची परंपरा', लेखन वाचन, भांडार, पुणे, प्र. आ. १९६१, पृ. १५५ ते १८४.

९) व्हटकर नामदेव, उनि., पृ.५४.

१०) शिंदे विश्वनाथ, 'पारंपरिक मराठी तमाशा आणि आधुनिक वगनाट्य', प्रतिमा प्रकाशन,


Scanned with CamScanner

११) पानसे मु. ग., 'यादवकालीन महाराष्ट्र' मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, प्र. आवृत्ती, १९६३, पृ. १६९-७१.

१२) व्हटकर नामदेव, 'मराठीचे लोकनाट्य तमाशा: कला आणि साहित्य', उनि., पृ.४३,४४.

१३) तत्रैव : पृ. क्र. ५०.

१४) तत्रैव : पृ. क्र. १२१.

१५) तत्रैव : पृ. क्र. १५७.

१६) तत्रैव : पृ. क्र. १६५ - १६६.

१७) तत्रैव : पृ. क्र. १७९.

१८) तत्रैव : पृ. क्र. १६९.

१९) तत्रैव : पृ. क्र. १८९.

२०) तत्रैव : पृ. क्र. १८९.

२१) ठोकळ, खरात-पाटील (संपा.): दगडूबा साळी (वग व लावण्या) मराठी तमाशा परिषद, पुणे प्रकाशन, प्र. आ., १९६१, पृ. क्र. २९ ते ८२.

२२) व्हटकर नामदेव,: उनि, पृ. २०१.

२३) डॉ. उत्तेकर सुनिता, 'शाहीर साबळे: व्यक्ती आणि वाङ्मय', पीएच. डी. प्रबंध, शिवाजी विद्यापीठ, १९९२ प्र. तिसरे, पृ. २१२.

२४) शिंदे विश्वनाथ, उनि., पृ. १४५.

२५) डॉ. उत्तेकर सुनिता, उनि., पृ. २१४.

२६) देशपांडे पु.ल.,'रेडिओवरील भाषणे आणि शृतिका भाग १', मौज प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती, २००१, पृ. क्र. ८५.


♦

Scanned with CamScanner